# योग्य काय?

## विचारहीन श्रद्धा की
## तर्काधिष्ठित विवेकवाद

प्रा. य. ना. वालावलकर

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**योग्य काय? विचारहीन श्रद्धा की तर्काधिष्ठित विवेकवाद**

प्रा. य. ना. वालावलकर

© सुरक्षित

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,

शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.

riyapublications@gmail.com

www.ajabgroup.com

**लेखक**

प्रा. य. ना. वालावलकर

बी.१३, सुयोगनगर, सेनापती बापट मार्ग,

पुणे - ४११०१६

फोन नं. ०२०-२५६३८१०८ मो. नं. : ९४०४६०९१२६

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ ३००/-

# *लेखकाचे निवेदन*

'श्रद्धा, तर्कबुद्धी आणि विवेक' हे निरीश्वरवाद या विषयावरील माझे दुसरे पुस्तक आहे. प्रस्तुत पुस्तकातील. 'विज्ञान मानवाचे आशास्थान' या लेखाला सुप्रसिद्ध वैज्ञानिक कार्ल सेगन यांच्या' 'द डेमन हाँटेड वर्ल्ड' या पुस्तकातील 'सायन्स अँड होप' या लेखाचा आधार आहे. तर 'प्रश्नोत्तरांतून चार्वाकवाद' या लेखातील चार्वाकसूत्रे प्रा. सदाशिव आठवले यांच्या 'चार्वाक इतिहास आणि तत्त्वज्ञान' या प्रबंधातून घेतली आहेत. अन्य सर्व लेख पूर्णतया स्वतंत्र आहेत. 'महाराजांचा ताप' या लेखात शंका कशा घ्याव्या आणि चमत्कारसदृश घटनेमागचे सत्य तर्कबुद्धीने कसे शोधता येते ते दाखवले आहे. तार्किक युक्तिवाद कसा करावा याचे दर्शन प्रत्येक लेखात आहे. उपनिषद् कालापासून चालत आलेली 'आत्मा' ही संकल्पना म्हणजे मानवी मेंदूच होय हे सप्रमाण दाखविण्याचा प्रयत्न 'आत्मा आणि मानवी मेंदू' या लेखात आहे.

'प्रत्येक श्रद्धेची चिकित्सा करावी. त्यासाठी स्वबुद्धी आणि आपला अनुभव विवेक म्हणजे कॉमनसेन्स वापरावा. जी गोष्ट खरी असण्याची शक्यता तर्कबुद्धीला पटेल तीच गोष्ट सत्य मानावी.' असा या पुस्तकाचा मध्यवर्ती संदेश आहे.

बालपणापासून मनावर बिंबवलेले श्रद्धेचे पूर्वग्रह बाजूला ठेवून शुद्ध तर्कबुद्धीने वाचल्यास या पुस्तकांतील विचार कुणाही सुबुद्ध व्यक्तीला पटावेत अशा पद्धतीने मांडले आहेत.

वाचकांचे प्रतिसाद, टीका, शंका यांचे मन:पूर्वक स्वागत आहे.

**प्रा. य. ना. वालावलकर**

✦✦✦

# *अनुक्रमणिका*


१. गॅस गणराज........................................................ ७
२. श्रद्धावंतांची मानसिकता.......................................... १२
३. शिव शिव रे काऊ। हा पिंडाचा घेई खाऊ।..................... १४
४. माझी विचारसरणी................................................ १७
५. दादा महाराजांचा ताप .......................................... २४
६. ऋग्वेदाचा अनोखा परिचय........................................ ३०
७. अंगारकी चतुर्थी ................................................ ३६
८. विश्वाच्या पसाऱ्यात मानवाचे स्थान............................. ३९
९. निसर्गनियम...................................................... ४३
१०. आत्मा आणि मानवी मेंदू......................................... ४७
११. वधू-वरांच्या कुंडल्या आणि वैवाहिक जीवन.................... ५३
१२. विज्ञान : मानवाचे आशास्थान.................................. ५५
१३. श्रद्धावंतांची अगतिकता.......................................... ७२
१४. बुद्धिदाता........................................................ ७४
१५. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या।.......................................... ७६
१६. मानवी बुद्धी आणि ज्ञान......................................... ७८
१७. लक्ष्मीची पाऊले.................................................. ८८
१८. फलज्योतिष हे शास्त्र नव्हेच!................................... ९०
१९. प्रश्नोत्तरांतून चार्वाकवाद ......................................... ९२
२०. गतानुगतिकता.................................................... ११८
२१. सदोष युक्तिवाद................................................... १२०
२२. अनुभव-विवेक (कॉमन सेन्स)................................... १२५
२३. मंत्रसामर्थ्य........................................................ १२८
२४. मृत्युपश्चात जीवन नाही.......................................... १३०

२५. गुरुविण कोण लावितो वाट?................................... १३२
२६. प्रश्नोत्तरी विवेकवाद............................................ १३६
२७. श्रद्धाळूचा युक्तिवाद : एक संवाद.............................. १४०
२८. श्रद्धावंतांची विचारसरणी........................................ १४२
२९. जैसे सूर्याचे न चलता चालणे.................................. १४४
३०. कार्यकारणभाव.................................................. १४८
३१. धार्मिक विधी.................................................... १५०
३२. आध्यात्मिक प्रवचन............................................ १५२
३३. मुक्त मानव ..................................................... १५५
३४. मूर्ती अमर असते का...?....................................... १५७
३५. माऊबा........................................................... १६०
३६. माझे मनोगत... श्री. भालचंद्र काळीकर ........................ १६३
३७. ईश्वर... एक मुक्त चिंतन! काळीकर ........................... १६७
३८. भगवद्गीता...................................................... १७४
३९. अध्यात्मवाद्यांची आवड ....................................... १७८
४०. सहप्रवासी : बावीस आस्तिक-एक नास्तिक.................. १८१
४१. आस्तिक-नास्तिक संवाद....................................... १८७
४२. श्री. जपे यांचा युक्तिवाद........................................ १९१
४३. बुडत्या श्रद्धेला प्रसादभक्षणाचा आधार......................... १९६
४४. वैष्णवीची गोष्ट................................................. २०१

**दैनिकांतील पत्रे................................................. २०६**

✦✦✦

# १. गॅस गणराज

तात्या कामत हे एक उत्साही देवभक्त आहेत. आता निवृत्तीनंतर त्यांचा उत्साह दुणावला आहे. आठवड्याच्या प्रत्येक वारी ते वेगवेगळ्या मंदिरात जातात. सोमवारी सिद्धेश्वराचे दर्शन. मग सबंध दिवस ॐ नम: शिवाय दुसरा जप नाही. मंगळवार हा तात्यांसाठी गणपतीचा वार. त्या दिवशी तळ्यातल्या गणपतीचे दर्शन घेऊन मग दिवसभर 'गणराऽऽज रंगी नाचतो नाऽऽचतोऽऽ।' हे त्यांचे आवडते गाणे. (म्हणजे मंगळवारी आवडते.) स्वर्गातील ती भरगच्च देवसभा, शिशुकौतुकासाठी आलेले शंकर-पार्वती, मानेवर चार डोकी सांभाळून ती डोलवत ताल धरणारा ब्रह्मदेव, रंभा-मेनका-ऊर्वशी अशा नृत्यनिपुण अप्सरांचे ते परीक्षक मंडळ, याचे साग्रसंगीत, रसभरित वर्णन तात्या उत्साहाने करतात. बालगणपतीच्या अरंगेत्रम् नृत्याचा हा कार्यक्रम खरोखर प्रत्यक्षात झाला अशी त्यांची दृढ श्रद्धा आहे. तात्यांच्या मते बुधवार हा पांडुरंगाचा वार. त्या दिवशी 'विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल.' गुरुवार उजाडला की, दत्तमंदिराकडे धाव घेऊन मग दिवसभर 'दत्त दिगंबर दैवत माझे.' शुक्रवारी अन्य सगळे देव विसरून, चतु:श्रृंगीच्या आदिशक्तीचे दर्शन घेऊन, 'अंबे तुज वाचोनी कोण पुरविल आशा' अशी आळवणी. शनिवारी मारुतीमंदिरात जाऊन, 'नीलांजनसमाभासं रविपुत्रं यमाग्रजम्। छाया-मार्तंडसंभूतं तं नमामि शनैश्चरम्।' या ओळी अडीच तास ऐकत बसणे. तात्या कामत रविवारी सुट्टी घेत नाहीत. त्या वारासाठी त्यांनी एक विशिष्ट देऊळ शोधले आहे. तिथे स्वामी समर्थ, गजानन महाराज आणि साईबाबा या तिघांच्या मूर्ती आहेत. तेथे प्रति रविवारी 'श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थऽऽ।, गण गण गणाऽऽत बोते। आणि सबका मालिक एक है।' आळीपाळीने. याप्रमाणे तात्यांचा भक्तिसप्ताह भरगच्च असतो. उत्साह दांडगा. कधी खंड नाही.

तात्या कामत माझ्या मित्र-परिवारातील नसले तरी ओळखीचे आहेत. कधी भेटले तर भरभरून बोलतात. तो त्यांचा स्वभाव आहे. बऱ्याच दिवसांनी परवा भेटले. ते बोलू लागले, ''तीनेक महिन्यांपूर्वी मी एका जुन्या, पेशवेकालीन

वाड्यात गेलो होतो. तिथे एक सर्वांगसुंदर गणेशमूर्ती दृष्टीस पडली. प्रथमदर्शनीच माझी श्रद्धा बसली. आज मंगळवार. त्याच वाड्यात गणराजाच्या दर्शनाला जात आहे. येणार का?'' त्यांनी हा प्रश्न डोळे मिचकावत गमतीने विचारला. माझी नास्तिक मते त्यांना चांगली ठाऊक आहेत.

''पण मंगळवारी तुम्ही तळ्यातल्या गणपतीला जाता ना?''

''जात होतो; पण या लिमये वाड्यातील गणराजाचा मला चांगला अनुभव आला. म्हणून आता प्रत्येक मंगळवारी इथे येतो.''

''गणपती इथला काय तिथला काय एकच ना?''

''असे कसे? स्थानमाहात्म्य असतेच. कुठलातरी गल्ली-बोळातील गणपती आणि वरळीचा सिद्धिविनायक सारखेच म्हणायचे का? वेगवेगळे अष्टविनायक आहेतच ना? त्या सर्वांचे दर्शन आपण- म्हणजे तुम्ही सोडा- घेतोच ना?''

''मला हे पटत नाही. स्थानिक लोकांच्या सोईसाठी वेगवेगळ्या ठिकाणी मूर्ती स्थापल्या. गणपतीची अनेक नावे असल्याने त्या मूर्तींना गजमुख, मोरेश्वर, बल्लाळ, सिद्धिविनायक अशी नावे दिली; पण मूळ गणपती एकच असला पाहिजे. हे स्थानमाहात्म्य, नाममाहात्म्य, मूर्तिमाहात्म्य, मंडळमाहात्म्य, पीतांबरमाहात्म्य, शुंडा (दक्षिण-वाम) माहात्म्य असे प्रकार बुद्धीला न पटणारे आहेत. समजा दिलीप प्रभावळकर यांचा हसवा-फसवी हा कार्यक्रम रंगमंचावर चालू आहे. त्यांना एक तातडीचा निरोप...''

मला मध्येच तोडत तात्या म्हणाले, ''तुम्हाला कसे पटणार? तुम्ही नास्तिक. श्रद्धा ठेवा. भक्तिभावाने दर्शन घ्या. अनुभव निश्चित येईल. मग पटेल.''

''श्रद्धेला आमच्या डोक्यात स्थानच नाही. ती कुठे ठेवायची? आणि पटते ते बुद्धीमुळे. न पटता खरे मानायचे ते श्रद्धेने. ते राहू द्या. त्या वाड्यातील गणपतीचा तुम्हाला काय अनुभव आला ते सांगा.''

''अनुभव साधा आहे; पण प्रचिती रोकडी आहे. पूर्ण पटणारी आहे. जे घडले ते त्याच्या कृपेनेच यात शंका नाही. तुम्हीसुद्धा तेच म्हणाल. आमच्या घरी दोन सिलिंडर आहेत.''

''कसले? स्वंयपाकाच्या गॅसचे का?''

''हो. आम्हाला एक सिलिंडर सहा आठवडे पुरतो. भरलेला लावला की, आठवड्याभरात नवीन नोंदवतो. तो ८/१० दिवसात मिळतो. इतके दिवस कधी

अडचण आली नाही; पण तीनेक महिन्यांपूर्वीची गोष्ट. भरला सिलिंडर लावला आणि पाहुणे आले. त्या गडबडीत गॅस नोंदवणे राहिले. दोन आठवड्यांनी नोंदवला. नेमकी त्याच वेळी गॅसटंचाई निर्माण झाली. आणखी दोन आठवडे गेले. सिलिंडर येईना. फोन केले, खेटे घातले. 'दोन दिवसात येईल' असे सांगत; पण नाहीच. तळ्यातल्या गणपतीची करुणा भाकली. उपयोग झाला नाही. लावलेला गॅस आता संपेल. मग काय करायचे? असे संकट उभे राहिले. संकटकाळी खऱ्या देवाची आठवण होते. मंगळवारी लिमये वाड्यातील गणराजाला साकडे घातले. तुम्हाला खरे वाटणार नाही; पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे बुधवारी गॅस आला. अगोदरचा शुक्रवारी संपला. हे देवाघरचे सत्य आहे. त्या गणराजाच्या कृपेने थोडक्यात वाचलो. घरची सांगत होती वरच्या अधिकाऱ्याला भेटा. मी थेट सर्वोच्च अधिकाऱ्याला गाठले.'' ते हसत म्हणाले.

''आश्चर्य वाटते!'' मी म्हणालो.

''वाटते ना? वाटणारच! अनुभव आहेच तसा.''

''त्या अखिल विश्वनिर्मात्याने एका भक्ताच्या वैयक्तिक कामात इतके बारकाईने लक्ष घालावे याचे आश्चर्य वाटले.''

''अहो, त्याला कठीण ते काय! सगळे सहज लीलया होते. नुसते मनात आणले की झाले. नाहीतर इतके दिवस न आलेला सिलिंडर नेमका बुधवारी यावा हे कसे? जरा श्रद्धेने विचार करा ना. श्रद्धा असणे महत्त्वाचे.''

''इतके दिवस न आल्यामुळे त्या दिवशी आला, हे उघड आहे. ते असो. ती अचानक गॅसटंचाई तुमच्या त्या गणराजानेच निर्माण केली असणार. आता हा अनुभव लिहून तुम्ही वर्तमानपत्रात द्या. छापून येईल. तो गणपती गॅस– गणराज म्हणून प्रसिद्धी पावेल. तुम्ही आद्य प्रवर्तक ठराल. लोक गॅस एजन्सीपुढे रांगा न लावता गॅस–गणरायापुढे लावतील.'' हे ऐकल्यावर तात्या विचारमग्न झाले. ती संधी साधून मी त्यांचा निरोप घेतला.

'श्रद्धेने विचार करा' हे त्यांचे वाक्य गमतीचे वाटले. विचार करता येतो तो बुद्धीने. श्रद्धेने नव्हे. श्रद्धा ठेवली की, विचार खुंटतो. ठप्प होतो. मूर्तीने मनात आणले की, सारे काही होते असे या श्रद्धाळूंना वाटते कसे? निर्जीव मूर्तीला मन असू शकते का? बरे, प्राणप्रतिष्ठा करताना काही मंत्र पुटपुटतात आणि मूर्तीच्या छातीच्या डाव्या बाजूला दूर्वांनी पाणी लावतात, म्हणून मूर्ती सजीव होते का?

तिला बुद्धी, मन अशा गोष्टी असतात का? मूर्तीत काही सामर्थ्य असते का? गझनीच्या मुहंमदाने सोरटी सोमनाथाची मूर्ती फोडली. मुस्लीम आक्रमकांनी अनेक देवमूर्तींचे भंजन केले. कुठल्या मूर्तीने कधी काही प्रतिकार केल्याची नोंद इतिहासात नाही. 'मूर्तीच्या समक्ष दानपेटी फोडली. देवीच्या अंगावरील दागिने चोरले. मुकुट पळविला. दिवेआगरच्या देवळात चोरटे घुसले. प्रतिकार करू पाहणाऱ्या रक्षकाला जीवे मारले. आपल्या निष्ठावंत सेवकाला देव वाचवू शकला नाही. चोरट्यांनी सुवर्णगणेश पळवला. तो त्यांच्याबरोबर निमूटपणे गेला.' या सर्व सत्य घटनांवर हे तात्या कामत आणि त्यांचे समश्रद्धाळू बुद्धीने विचार का करीत नाहीत? की श्रद्धेने विचार करू जातात? मला वाटते श्रद्धाळू माणसे अशा वास्तविक घटनांवर विचार करायला घाबरतात. कारण बुद्धीने विचार केला तर मूर्ती म्हणजे निर्जीव बाहुली हे त्यांच्या सहज लक्षात येईल. मग इतकी वर्षे उराशी बाळगलेल्या श्रद्धेचे काय? आपले श्रद्धास्थान निरर्थक ठरले तर कसे व्हायचे? श्रद्धेविना आपण उघडे पडू. अशी भीती त्यांना वाटते. याविषयी एक किस्सा आहे.

...परवा लक्ष्मी रस्त्यावर भाऊ नेने भेटले. अस्वस्थ दिसले. ''काय कसल्या चिंतेत आहात?'' त्यांना विचारले. म्हणाले,

''अहो, घरून निघताना खरेदीसाठी ५०० रु. च्या सहा नोटा घेतल्या होत्या. त्यातील एकही आता सापडत नाही.''

''सगळे खिसे, पाकिटे तपासली का?''

''हो. हा पुढचा, पट्ट्याजवळचा लहानसा खिसा तेवढा राहिलाय.''

''त्यात त्या नोटा असण्याची शक्यताच नाही काय?''

''आहे. तशी शक्यता आहे.''

''अहो, मग बघा की!''

''आणि त्यात नोटा नसल्या तर काय करू? त्या तिथे असतील या आशेवर मी आहे.''

''म्हणजे नोटा त्या खिशात आहेत अशी तुमची श्रद्धा आहे. तिचा खरे-खोटेपणा तपासायला म्हणजे चिकित्सा करायला तुमचे मन धजावत नाही.''

''तसे म्हणा हवे तर; पण मी काय करू?''

आपल्या श्रद्धेची चिकित्सा करण्याचे धैर्य श्रद्धावंतांना नसते. श्रद्धा खोटी ठरली तर काय करायचे? अशी भीती त्यांना असते. 'देवावर माझी श्रद्धा आहे.